आजचे कार्यक्रम

✻ नाशिक महानगर आणि जिल्ह्यात अनेक नामवंत डॉक्टर यांच्या कार्याचा गौरव 'डॉक्टर्स दिना'चे औचित्य साधून 'जीवन संजीवन पुरस्कार' सोहळा दै. 'देशदूत'च्या वतीने सायं. पाच वाजता. विभागीय महसूल आयुक्त तथा सिंहस्थ प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ या मुख्य अतिथींच्या हस्ते नासिक्लब येथे.

✻ महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशन आणि नाशिक जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि डी. एस. एफ. स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या सहकार्याने नाशिकच्या पंचवटी येथील स्व. मीनाताई ठाकरे, विभागीय क्रीडा संकुल येथे दिनांक ५ ते ७ जुलै दरम्यान ७ व्या चाईल्ड काप आणि १३ व्या मिनी गटाच्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन.

✻ नाशिक सेवा समितीतफ ` दुपारी साडेतीनला नाशिकमध्ये 'श्री हनुमंत चरित्र एक विवेचन' या विषयावर आचार्य श्री हरीकृष्ण महाराज यांचे प्रवचन, जुना गंगापुर नाका येथील शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृहात

पान १ वरून ...

एक पाऊल प्लास्टिक मुक्तीकडे...!

समाजात अनेक प्रयोग केले जात आहेत. दिंडोरीच्या स्वामी समर्थ केंद्राच्या पर्यावरण गतिविधी विभागाने नाशिक शहरासह जिल्हा आणि राज्यात अनेक ठिकाणी 'स्टील ताटांची बँक'सुरु केली आहे. पंचवीस ते पाचशे माणसांच्या जेवणावळीसाठी या बँकेतून ताट, वाटी, पेला आणि चमचा मोफत उपलब्ध करून दिला जातो. थर्माकोलयुक्त ताटे आणि पेल्यांचा वापर थांबवणे हा त्यामागचा उद्देश आहे. अशा प्रयोगांचे अनुकरण सामान्य माणसांना शक्य वाटते, हे अशा प्रयोगांचे वैशिष्ट्य आहे. प्लास्टिक पिशवीला 'नाही' म्हणण्याची त्यांची एक छोटी कृती प्रभावी परिणाम साधू शकेल. कारण कोणत्याही प्रकारच्या प्रदूषणाचे परिणाम सामान्य माणसांना जास्त सोसावे लागतात. तात्पर्य, अशा प्रयोगांना अनुकूल प्रतिसाद देऊन ते सार्थ ठरवणे ही सामान्य माणसांचीदेखील जबाबदारी आहे.

... तर कर्जवसुलीची रक्कम सभासदांच्या खात्यात

शेतकरी सभासद प्रतिनिधी निवडीवरुन बराच वाद झाला. त्यानंतर बिडवई यांनी ओटीएस योजनेची माहिती दिली.

बँकेचा परवाना वाचवण्यासाठी तूर्त ओटीएस योजनेला मंजुरी देण्याची विनंती बँकेचे संस्थात्मक सल्लागार विद्याधर अनास्कर यांनी केली होती. नाबार्डने बँकेचा परवाना रद्द करण्याचा इशारा दिला असल्याने, बँक वाचवणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. सभासदांनी वारंवार संपूर्ण कर्जमाफीची मागणी केली. शासनाने कर्जमाफी केल्यास शेतकऱ्यांनी भरलेले पैसे त्यांच्या कर्जखाती किंवा बचत खात्यात जमा करावेत, अशी मागणीही करण्यात आली. या बैठकीत अनेक वादळी चर्चा आणि आरोप-प्रत्यारोप झाले, तरी अखेर बँकेचा परवाना वाचवण्यासाठी ओटीएस योजनेला मंजुरी देण्यात आली. शेतकऱ्यांच्या मागण्या शासनाकडे पाठवल्या जातील असे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले आहे.

कृषिमंत्री कोकाटेंवर टीका

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बिगर शेती कर्ज वाटप चौकशीत दोषी असतानाही त्यांना मानाचे स्थान मिळाल्याने शेतकरी संघटनांनी सहकार खाते, जिल्हा बँक प्रशासन आणि कोकाटे यांचा निषेध नोंदवला.

प्रमुख मागण्या

- थकबाकीदारांनी मुद्दलाची रक्कम ७ ते १० हप्त्यांमध्ये भरावी.
- कर्जाचे संपूर्ण व्याज शासनाने भरावे.
- शासनाने कर्जमाफी केल्यास, ज्या शेतकऱ्यांनी कर्जाची रक्कम भरली आहे, त्यांचे पैसे त्यांच्या खात्यात जमा करावेत.
- विविध कार्यकारी सोसायट्यांना होणारा तोटा बँकेने भरून द्यावा.
- ३१ मार्च २०२६ पर्यंत कोणतीही कारवाई शेतकऱ्यांवर करण्यात येऊ नये आणि वृत्तपत्रात वसुलीच्या जाहिराती देऊ नयेत.

कोण काय म्हणाले...

- कॉम्रेड राजू देसले: नाशिक जिल्हा बँक वाचवण्यासाठी ७५० कोटी रुपये भागभांडवलमध्ये राज्य सरकारने गुंतवणूक करावी. शेतकरी कर्ज समायोजन योजना व्याज राज्य सरकारने द्यावे. १२ लाख ठेवीदारांना न्याय द्यावा.
- उद्धव निमसे: बँकेला अडचणीत आणणारी कीड ठेचावीच लागेल.
- ॲड. नितीन ठाकरे: बचत आणि चालू खात्यातील रक्कम ठेवीत गुंतवावी.
- डॉ. सुनील ढिकले: आमच्याकडून पैसे मागण्याऐवजी शासनाकडून भागभांडवल मिळवा, कर्जमाफी द्या.
- प्रकाश शिंदे: ही ओटीएस योजना सभासदांच्या सहकार्याशिवाय यशस्वी होणे शक्य नाही.

शिंदेंच्या 'जय गुजरात'वरून वादंग

आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर सावध भूमिका घेतल्याचे दिसत आहे.

पुण्यातील 'जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटर'च्या उद्घाटन समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते. त्यावेळी बोलतांना शिंदे म्हणाले, की अमितभाई हे महाराष्ट्राचे जावई आहेत. ते देशाचे गृहमंत्री आहेत. तर त्यांच्या होम मिनिस्टर या महाराष्ट्रातील कोल्हापूरच्या आहेत. त्यांच्या घरात गुजराती आणि मराठी आनंदाने नांदतात. त्यानंतर या भाषणाचा समारोप शिंदे यांनी 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' असा नारा देत केला. त्यामुळे त्यांच्यावर सर्व स्तरांतून टीकेची झोड उठली आहे. या टीकेला प्रत्युत्तर देताना फडणवीस म्हणाले की, एखाद्या नेत्याने गुजराती समाजात गेल्यानंतर जय महाराष्ट्र, जय गुजरात असे म्हणणे यात गैर काहीही नाही. आपण महाराष्ट्रात राहिल्यानंतर मराठी शिकावी, असा आग्रह करू शकतो. पण दुराग्रह धरू शकत नाही. मी उद्या तामिळनाडूमध्ये गेल्यानंतर कोणीही मला तमिळ शिकण्याचा दुराग्रह करू शकत नाही.

सत्तेसाठी लाचार झालेला माणूसच महाराष्ट्रातील कार्यक्रमात 'जय गुजरात'ची घोषणा देऊ शकतो. 'जय गुजरात'म्हणणारे शिंदे हे अमित शहांचे गुलाम आहेत.

■ हर्षवर्धन सपकाळ, प्रदेशाध्यक्ष,काँग्रेस

अमित शाह यांच्या डुप्लिकेट शिवसेनेचे खरे रूप आज बाहेर आले. पुण्यात या महाशयांनी अमित शहा यांच्यासमोर 'जय गुजरात' ची गर्जना केली! काय करायचे? ऐशा नरा मोजूनी माराव्या पैजारा, हजार माराव्या आणि एक मोजाव्या. हा माणूस महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कसा राहू शकतो?

■ संजय राऊत,नेते,शिवसेना उबाठा

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९७,४००
२२ कॅरेट	८९,६१०
चांदी (प्रति किलो)	
१०९०००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८३,४३३
	(+१९३)
निफ्टी	२५,४६१
	(+५६)

बाजार भाव

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१७३८८	६००	२१००	१५१०
विंचूर	१५२६७	६००	१८००	१५००
निफाड	-	६००	१७५१	१५००
सायखेडा	३५९०	७००	२१००	१५००
पिंपळगाव	१६०००	८००	२०७०	१४५१

प्रांताधिकारी किसवे निलंबित

केला होता. त्यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, २००२ च्या परिपत्रकानुसार भूखंड किंवा शेतीच्या अदलाबदलीसाठी जमिनी सलग असणे आवश्यक आहे. परंतु, उदय किसवे यांनी संगमेश्वरची जमीन गुगळगावला आणि गुगळगावची जमीन संगमेश्वरला स्वॅप करून नियमांचा भंग केला. यामुळे त्यांचे निलंबन करत एका महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण करून कठोर कारवाई करण्याचे आश्वासन बावनकुळे यांनी यावेळी दिले.

या जमिनीचे १६ विभाग आणि २७२ तुकडे करून तुकडेबंदी कायद्याचे तसेच एमआरटीपी कायद्याचे उल्लंघन झाले आहे. २०१३ ते २०१९ या काळात २५८ अनधिकृत दस्त नोंदणी झाल्याचा गंभीर आरोप पडळकर यांनी यावेळी केला. त्यावर या प्रकरणात मुद्रांक अधिकारी भुरके, गावित, कापडणे , गुप्ते, हिरे, कळसकर, मोतीराळे आणि वाणी यांनी चुकीच्या दस्तनोंदणीद्वारे अधिकाराचा गैरवापर केल्याचे समोर आले आहे. या सर्व आठ अधिकाऱ्यांवर प्राथमिक चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई पूर्ण करण्यात येईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

चातुर्मासात कांदा मागणीवर परिणाम होणार

नाशिक । प्रतिनिधी

चार्तुमासाची सुरूवात झाल्याने याचा परिणाम कांदा मागणीवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच महिन्यात कांद्याची आवक बाजार समित्यात अधिक आहे. आणि याच दरम्यान कांदा खाण्यास व्यर्ज करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याने त्याचा परिणाम किरकोळ बाजारात कांद्यावर अधिक होणार, अशी चर्चा सुरू आहे.

दरम्यान आज प्रमुख कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव,पिंपळगाव, आणि उमराणे येथे कांद्याची आवक अधिक होती.

शेवगा १२० रुपये किलो

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या मुख्य मार्केट यांर्डात गेल्या आठ दिवसांपासून भाजीपाल्याची आवक घटलेली आहे. त्यामुळे सर्वच भाज्यांचे दर वाढलेले आहे. यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला झळ बसत आहे. शेवगाही फळभाजी आरोग्यदायी असल्याने अनेकांकडून त्याची खरेदी केली जाते. मात्र, यार्डात येणाऱ्या शेवग्याच्या शेंगाची आवक घटलेली आहे. शेवगा जागेवरच घाऊक स्वरूपात १२० रुपये किलो दराने विक्री होत आहे. त्यामुळे किरकोळ भाजीबाजारात शेवग्याच्या शेंगा सर्वाधिक दराने विक्री होताना दिसत आहे.

अन्याय- अत्याचाराचा वणवा!

राज्य पोलीस दलाच्या नागरी हक्क संरक्षण विभागाच्या माहितीनुसार, ॲट्रॉसिटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासह दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी नागरी हक्क संरक्षण विभागाने पोलीस ठाणे स्तरावर यावर्षी मे २०२५ पर्यंत ५१० कार्यशाळा घेतल्या आहेत. अत्याचाराच्या घटनांची पुनरावृत्ती नको म्हणून, विविध समाज घटकांच्या जातीय सलोखा बैठका घेण्यात आल्या. त्यानुसार, मे २०२५ पर्यंत ४१८ बैठका घेण्यात आल्या आहेत. दरम्यान, ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यांचा आढावा घेता, त्यात सन २०२४ मध्ये राज्यातील नऊ परिक्षेत्रांत एकूण ३ हजार ९४३ गुन्हे नोंद झाले. त्यानंतर, सन २०२५ मध्ये मे अखेर १ हजार ८११ गुन्हे नोंद झाले आहेत. तुलनात्मक विचार करता, कोल्हापूर, त्यानंतर छत्रपती संभाजीनगर व नाशिक परिक्षेत्रात ॲट्रॉसिटी दाखल होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून मुंबई आणि कोकण परिक्षेत्रात हे प्रमाण अत्यल्प आहे. तर, चालू वर्षी कोल्हापूर परिक्षेत्रात सतरा गुन्हे घटले आहेत. तर, कोकण परिक्षेत्रात मागील वर्षीच्या तुलनेत मे २०२५ मध्ये तब्बल ३६ गुन्ह्यांची वाढ झाली आहे.

न्यायालयात प्रलंबित तीन परिक्षेत्रातील गुन्हे

परिक्षेत्र	गुन्हे
नाशिक	२,६९२
छ. संभाजीनगर	२,३६५
कोल्हापूर	५,२४१

एसएमबीटी हॉस्पिटलच्या 'आरोग्यसाधना'ची दशकपूर्ती

राज्यातील सर्वात मोठे आरोग्य शिबिर

नाशिक । प्रतिनिधी

उपचारांच्या गुणवत्तेत कुठलीही तडजोड न करता सर्वसामान्यांना मोफत तसेच कमीत कमी खर्चात दर्जेदार उपचार मिळावेत, या हेतूने सुरु करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या 'आरोग्यसाधना' शिबिरास नुकतीच सुरुवात झाली.

शिबिरांतर्गत शासकीय योजनेत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. शासकीय योजनेत न बसणाऱ्या रुग्णांवर औषधे व इतर तपासण्या अत्यल्प दरात उपलब्ध असल्याची माहिती चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी दिली.

समाजातील हजारो रुग्णांवर वेगवेगळ्या रुग्णालयात शासकीय योजनेच्या माध्यमातून मोफत उपचार करण्यात येत आहेत. मात्र, आजही योजनेत समाविष्ट नसलेल्या आजारांचा खर्च मोठा असल्याने अनेक रुग्ण उपचारांपासून वंचित राहतात. उत्तम गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा गाव-पाड्याच्या अखेरच्या घटकापर्यंत पोहचावी, सर्वांना दर्जेदार उपचारांचा लाभ मोफत आणि अत्यल्पदरात मिळावा यासाठी या आरोग्य शिबिराची पुन्हा घोषणा करण्यात आली आहे. यानुसार एसएमबीटी हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी हॉस्पिटलची फी, डॉक्टरांची तपासणी फी, नर्सिंग चार्जेस, बेड चार्जेस, भूलतज्ज्ञांची फी, ऑपरेशन (ओटी) चार्जेस आणि जेवण इत्यादी सुविधा मोफत करण्यात आल्या आहेत. रुग्णांना केवळ अत्यल्प दरातील रेडिओलॉजी, रक्ताच्या तपासण्या आणि सवलतीतील औषधांचा खर्च करावा लागणार असल्याचे सचिन बोरसे यांनी सांगितले.

इगतपुरी तालुक्यातील सिन्नर-घोटी रस्त्यावरील नंदी हिल्स येथे असलेल्या 'एसएमबीटी हॉस्पिटल'मध्ये विविध आजारांवरील उपचार मोफत होतात. १२०० बेडची क्षमता असलेल्या या हॉस्पिटलमध्ये ३७० पेक्षा अधिक अनुभवी डॉक्टर्स पूर्णवेळ सेवा बजावत आहेत. २०० पेक्षा अधिक आयसीयु बेड्स उपलब्ध आहेत, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र ओपीडी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेले सतरा मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर्स, लहान मुलांसाठी पीआयसीयु, एनआयसीयू उपलब्ध आहेत, चोवीस तास उपलब्ध असणारा अतिदक्षता अपघात विभाग, अत्याधुनिक कॅथलब आणि कार्डियाक ओटी,रुग्णांच्या नातेवाईकांसाठी रुग्ण समन्वयक यांचे पूर्णवेळ मार्गदर्शन, हॉस्पिटलचा स्वच्छ व विस्तीर्ण परिसर यामुळे महाराष्ट्रातील महत्वाचे आरोग्य उपचार केंद्र म्हणून एसएमबीटीकडे बघितले जात आहे. याठिकाणी याठिकाणी सव्वीसहून अधिक सुपर स्पेशालिटी आणि स्पेशालिटी सेवा एकाच छताखाली उपलब्ध आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेऊन निरोगी जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

शिबिरात हॉस्पिटल फी, डॉक्टर फी, नर्सिंग चार्जेस , बेड चार्जेस, भूलतज्ज्ञ फी, ऑपरेशन चार्जेस, जेवण पूर्णपणे मोफत करण्यात आले आहे. शिवाय रुग्णांच्या नातेवाईकांना निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध आहे. या शिबिरात रुग्णांना हॉस्पिटलमध्ये अत्यल्प दरात रेडिओलॉजी, रक्ताच्या चाचण्या आणि औषधे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

■ डॉ. मीनल मोहगावकर, अधिष्ठाता

गुडघेदुखी : कारणे, लक्षणे, उपचार

आजकल गुडघेदुखीची समस्या वाढलेली दिसते आहे. अनेक लोकांना गुडघेदुखीचा त्रास होतो, विशेषतः वाढत्या वयासोबत हा त्रास जास्त जाणवून येतो. वयानुसार येणारी पारंपरिक झीज प्रत्येकाला येतेच. कोणाला कमी त्रास होतो तर कोणाला जास्त. आजकालच्या राहणीमानामुळे वयाच्या पन्नाशीत येणारे आजार जरा जास्तच लवकर यायला लागले आहेत. सर्वसाधारणपणे काही प्रमाणात जर कोणी व्यायाम करत असतील तर त्या लोकांना अंशतः त्रास काही अंशी उशिरा होतो.

बऱ्याच वेळा खूर्ची वर बसून काम करणाऱ्या लोकांना गुडघेदुखी लवकर जाणवते. गुडघ्याशी संबंधित हाडांना फ्रॅक्चर होणे, गादी फाटणे, गुडघ्यावर झालेल्या शस्त्रक्रिया या सर्व गोष्टींमुळे गुडघ्याची झीज थोड्या अंशी लवकर होऊ शकते.

डॉ. सत्यजित सोनजे

सर्वसाधारण इलाज : १) ज्या गोष्टींमुळे गुडघ्यावर ताण येतो त्या गोष्टी टाळणे.२) गुडघ्याशी संबंधित असलेले व्यायाम ३) गोळ्या औषधे : साधारणपणे सुरवातीच्या काळात गोळ्या औषधांचा फायदा होतो (पेन किलर्स थोडे दिवस रुग्ण घेऊ शकतो) Supplements (to recover Arthritis changes) like Glucosamine Or collagen support. ४) इंजेक्शन थेरonr- (Ideal For Gr1 n Gr2 OA knees) (steroids or visco elastic materials) डॉ. च्या सल्ल्यानुसार घेणे ५) शेवटचा पर्याय कृत्रिम सांधे रोपण (टोटल नी रिप्लेसमेंट)

१०२ एबीएच टाऊन स्क्वेअर, सिटी सेंटर मॉल सिग्नल, उंटवाडी येथील डॉ. सत्यजित सोमनाथ सोनजे यांच्या स्पार्क बोन्स अँड जॉइंट्स क्लिनिकमध्ये सर्व अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय आत्याधुनिक सुविधा असलेले त्रिमूर्ती उंटवाडी लिंकरोड येथील हॉस्पिटल सेव्हन हिल्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्येही ते रुग्णसेवा देतात. याठिकाणी ते संचालक म्हणून कार्यरत आहेत.

शब्दकोडे :२९२



आडवे शब्द : १) जिवनात निर्माण होणारी समस्या (पेच) ५) निर्धास्तपणे ८) वानर ११) खंदक १२) जोराने आवळून बांधणे १४) करमणूक करणारे १५) रानरेडा १६) मजबूत १८) बारीक मऊ केस १९) सर्प, साप २०) सज्ज २१) चंद्र २२) जुळी मुले २४) रात्री चमकरणारा किडा २६) दया २७) काही न खाता २९) नोकर ३१) सत्वांश ३३) आच्छादन ३४) महादेव ३६) फुटाणे ३७) रखवालदार, व्हिसलब्लोअरसाठी वापरला जाणारा शब्द ३८) चमक, मुरगाळा ४०) सडलेले, कांडलेले (धान्य) ४१) नकली दात ४२) पुण्याचा रहिवासी ४३) स्पर्धेतील प्रतिस्पर्धी ४४) छोटी लढाई ४६) घोड्याचे अंग घासणे ४७) पादाक्रांत करणे, शिक्षकांसाठी वापरला जाणारा इंग्रजी शब्द ४९) प्रतिष्ठा, अब्रू ५०) वडील (ग्रा) ५१) हूंगण्याचे तंबाकूचे चूर्ण ५२) ठाण्याचा रहिवासी ५४) खोडण्याचे साधन, केस बांधण्यासाठी वापरली जाणारी एक लवचिक वस्तू ५६) तन...धन, माईंड (मराठी) ५७) स्वयंवरातील अट, निश्चय ५८) मला ५९) तारकांचा स्वामी चंद्र ६३) पिकांवरील एक रोग ६५) काळाकभिन्न ६८) मरेपर्यंत ७०) कमीज बरोबरचे वस्त्र ७२) सीतेच्या वडीलांचे नाव ७३) नशीब, दैव (इंग्रजी) ७४) घमघमाट ७५) वाळा, विशेष

उभेशब्द : १) स्क्रू पिळण्याचे साधन २) पाय ३) मिश्रण, मिसळ ४) फळातील मगज ५) चव नसलेले ६) कोथिंबीरीचे बी ७) पंजातील शेवटचे पातळ बोट ८) पालेभाजी ९) शिकार १०) एक शेंगभाजी १३) तोडणे (हात, पाय) वा. प्र १७) एक त्वचा रोग १९) होडी २०) सर्वांनी मिळून एखादे काम पूर्ण करणे २२) मालाचे येणे-जाणे २३) जाणारा २४) मराठी आठवा महिना २५) बोलणे, जिभ २८) शांतता देणारा, चंद्र ३०) धान्यातील मातीचे कण ३२) पुर्ण ३४) शंका घेण्याजोगे ३५) तापा पुर्वीचे अंग मोडून येणे ३९) स्वच्छ, चमकणारे ४१) उणीव ४२) जुने, प्राचीन ४५) बशीचा जोडीदार ४७) मालाची विक्री ४८) दागदागिने ५०) छोटा ५२) देवस्थान ५३) मातीचा कण, (पराग) ५५) भरभराट ५६) शीर्षक ६०) चौक ६१) निष्णात, पक्का ६२) साहित्यातील नऊ भावना ६४) आकर्षक, मोहात टाकणारे ६६) गवताची बारीक पातळ कांडी ६७) संध्याकाळ ६९) नांगर ७१) तंतूमय वनस्पती

शब्दकोड२९१चे उत्तर